MO.9860898564

अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचाराचा कर्दनकाळ

सायं.दैनिक महाराष्ट्र

# आरंभ

संपादक - दिपक थोरात

बीड (महाराष्ट्र) | सायं.दैनिक | मराठी | वर्ष -०२ | अंक -०४ | शनिवार दि.२१ सप्टेंबर २०२४ | आरएनआय -एमएएचएमएआर/२०२३/८३९६५ | किंमत ३ रू | । पाने ४

Beed (Maharashtra) | Daily Evening | MARATHI | Year-02 | Issue -04 | SATURDAY DT.21 SEPTEMBER 2024 | RNI : MAHMAR/2023/83965 | PRICE - 3 RUPEES | PAGES - 4

## बस अपघाताची घटना वेदनादायक ; आ. पंकजाताई मुंडे यांनी शोकाकुल भावना व्यक्त करत वाहिली मयत प्रवाशांना श्रध्दांजली



बीड ।प्रतिनिधी

जालना ते वडीगोद्री मार्गावर मठतांडा (ता.अंबड) येथे झालेल्या बस व ट्रकच्या भीषण अपघाताची दुर्घटना अतिशय दुर्दैवी आणि वेदनादायक आहे, अशा शब्दांत भाजपच्या राष्ट्रीय सचिव आ. पंकजाताई मुंडे यांनी शोकाकुल भावना व्यक्त करत अपघातात मृत्युमुखी पडलेल्या नागरिकांना भावपूर्ण श्रध्दांजली अर्पण केली.

हा अपघात अतिशय दुर्दैवी होता. यात आमचा अंत्यत धडाडीचा कार्यकर्ता आणि निकटवर्तीय बंडू बारगजे यांचं दुर्दैवी निधन झाल्याची बातमी मनाला चटका लावून जाणारी आहे.या अपघातात एकूण आठ जणांचा मृत्यू झाल्याचे समजले. दुर्घटना अत्यंत दुर्दैवी आणि वेदनादायी आहे. बंडू बारगजेंसह अपघातात मृत्यू झालेल्या नागरिकांना भावपूर्ण श्रद्धांजली !!मृतांच्या कुटुंबियांप्रती शोक संवेदना व्यक्त करते.तसेच जखमींना लवकरात लवकर बरं वाटावं, अशी प्रार्थना करते असं आ. पंकजाताई म्हणाल्या.

# जरांगे पाटलांच्या समर्थनार्थ जिल्हा कडकडीत बंद

### बंद शांततेत: पोलिसांचा तगडा बंदोबस्त, जिल्हाधिकाऱ्यांना समाजबांधवांनी दिले निवेदन





**बीड, (प्रतिनिधी):-मराठा समाजाला ओबीसीतून आरक्षण मिळावे या प्रमुख मागणीसाठी अंतरवाली सराटी येथे सहाव्यांदा अमरण उपोषण करत असलेले मराठा संघर्ष योध्दा मनोज जरांगे पाटील यांच्या समर्थनार्थ बीड जिल्हा सकल मराठा समाजाच्या वतीने आज बीड बंदची हाक दिली होती. या हाकेला प्रतिसाद म्हणून बीड शहरासह जिल्ह्यातील बहुतांश भागात कडकडीत बंद पाळण्यात आला. दुपारपर्यंत बंद शांततेत संपन्न झाला. कोठेही अप्रिय घटना अथवा गोंधळाची माहिती मिळाली नाही. बंदच्या पार्श्वभूमीवर बीड पोलीस दलाने तगडा बंदोबस्त ठेवला होता. बंद दरम्यान आंदोलनकर्त्यांनी जिल्हाधिकारी यांना मागण्यांचे निवेदन दिले.**

मराठा संघर्षयोध्दा मनोज जरांगे पाटील यांनी अंतरवाली सराटी येथे आरक्षणाच्या मागणीसाठी उपोषण सुरू केले आहे. राज्यशासनाच्या वतीने मराठा आरक्षण लागू करण्याचा शब्द देण्यात आला होता. मात्र मराठा समाजाच्या पदरी पुन्हा निराशाच पडली. राज्यातील विविध मंत्री यांनीही आश्वासने दिली, मात्र ती पुर्ण होवू शकली नाही. राज्यात आंदोलन, उपोषण व मार्चे काढण्यात आले. मात्र मराठा आरक्षण अद्यापही मिळालेले नसल्याने मनोज जरांगे पाटील यांनी पुन्हा उपोषणाचे हत्यार उपसले आहे. अंतरवाली सराटी येथे उपोषण करत असतांना त्यांची प्रकृती खालावली आहे. त्यांच्या उपोषणाला पाठींबा व समर्थन म्हणून बीड जिल्हा सकल मराठा समाजाच्या वतीने दि. २१ सप्टेंबर रोजी बंदची हाक दिली होती. जिल्ह्यातील व्यापाऱ्यांनी याला सहकार्य करत दुपारपर्यंत पुर्ण व्यवहार बंद ठेवले होते. शहरातून बाईकरॅलीच्या माध्यमातून आंदोलकांनी शासनाचा निषेध करत मराठा समाजाला ओबीसीतून तात्काळ आरक्षण लागू करण्याची मागणी केली. तसेच जिल्हाधिकारी यांना निवेदन देण्यात आले. बंदच्या पार्श्वभूमीवर बीड जिल्ह्यात पोलीस अधिक्षक अविनाश बारगळ यांच्या मार्गदर्शनाखाली मोठा बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

## पेठ बीड पोलिसांनी बालं लैगीक अत्याचारातील आरोपींच्या आवळ्या मुस्क्या

### पि आय अशोक मुदिराज यांनी केली अटक

बीड ।प्रतिनिधी

पोलिस स्टेशन पेठबीड गु.र.नं. २७३/२४ कलम ६४(२)(१),६५ (२),७४ ७५,७९,३३३,११५ (२)३५१(२), भारतीय न्यायसंहीता २०२३ सह कलम ४,६,८ बालकांचे लैंगीक अत्याचारापासुन संरक्षण अधि. २०१२ मधील कुर आरोपीस गुन्हा दाखल होताच घेतले ताब्यात.

पोलीस ठाणे पेठ बीड येथे फिर्यादी यांनी दिनांक २०/०९/२०२४ रोजी पोलीस ठाणे पेठ बीड येथे फिर्याद दिली की, दिनांक २०/०९/२०२४ रोजी रोजी तक्रार दिली की. त्यांची अल्पवयीन ११ वर्षाची मुलगी ही दुपारची शाळा सुटल्यावर जेवण करण्यासाठी घरी आली व घराचे दार बंद करुन घरात जेवण करत असताना यातील आरोपी अभिमन्यु उदधव जाधव हा फिर्यादीचे घरी आला व घराचे दारावर फरशी मारुन लाथा मारल्या त्यावेळी फिर्यादीचे मुलीने घराचे दार उघडले त्यावेळी तो अंडरपँटवर अर्धनग्न अवस्थेत घरात घुसला व फिर्यादीच्या मुलीला कवटाळीमध्ये उचलुन घेतले व गळा दाबुन तु गुपचुप बस काही आरडाओरड करु नको व तुझे कपडे काढ असे म्हणुन त्याने फिर्यादीच्या मुलीला कपडे काढायला लावले व कपडे काढल्यावर मुलीच्या लघवीच्या जागेत बोट घालुन तिची छाती दाबुन तिच्या पप्या घेतल्या व फिर्यादी सोडवण्यासाठी गेली असता तिला तोंडात चापट मारुन



फिर्यादीस धंदयावाली असे घाण बोलला वगैरे मजकुरचे फिर्याद सांगीतले बरोबर सदर घटनेचे गांभीर्य लक्षात घेवुन पोलीस निरीक्षक श्री. अशोक का. मुदिराज यांनी याबाबत मा. पोलिस अधिक्षक श्री. अविनाश बारगळ साहेब, अपर पोलिस अधिक्षक श्री. सचिन पांडकर, उपविभागीय पोलिस अधिकारी श्री. विश्वांबर गोल्डे यांना माहीती देवुन मा. वरीष्ठांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक अशोक मुदिराज यांनी पोलीस ठाणे पेठ बीड येथील पोहेका / १३५३ सुभाष मोठे, पोना/१८३५ अजित शिकेतोड होमगार्ड नवनाथ चव्हाण यांना आरोपीला पकडण्यासाठी पाठवले. सदर आरोपी हा गुन्हेगार वृत्तीचा असुन त्याच्यावर चोरीचे व भांडणाचे अनेक गुन्हे असल्याने त्यांनी पोलीसांना जुमानले नाही पोलीसासोंबत झटापट केली त्यावेळी नमुद पोलीस अंमलदार यांनी बळाचा वापर करुन सदर आरोपीच्या मुसक्या बांधुन पोलीस ठाणे पेठ बीड येथे आणले. सदरची माहीती समजताच सहा. पोलीस निरीक्षक सुदाम शिरसाट व पिंक पथकाचे प्रमुख सहा. पोलीस निरीक्षक लांडगे साहेब यांनी तात्काळ पोलीस ठाणे येथे येवुन सदर फिर्यादी यांची फिर्याद नोंदवनु आरोपीस गुन्हयामध्ये अटक केले आहे.

## शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षात जोरदार इनकमिंग सुरू शिवसेना जिल्हाप्रमुख परमेश्वर सातपुते

शिवसेना पक्षप्रमुख तथा महाराष्ट्र राज्याचे माजी मुख्यमंत्री कुटुंबप्रमुख माननीय उद्धवजी ठाकरे साहेब यांच्या विचारांशी प्रेरित होऊन व शिवसेना जिल्हाप्रमुख परमेश्वर सातपुते सर यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून बीड जिल्ह्यातील अनेक नेते व असंख्य कार्यकर्ते शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षात प्रवेश घेणार आहेत. काल सावता सेनेचे प्रदेश कार्याध्यक्ष तथा राष्ट्रीय काँग्रेस सहकार आघाडीचे जिल्हाध्यक्ष ठकसेन तुपे यांनी आज शिवसेना जनसंपर्क कार्यालय बार्शी रोड बीड येथे शिवसेना जिल्हाप्रमुख परमेश्वर सातपुते सर यांच्या हस्ते शिवबंधन बांधून शिवसेनेत जाहीर प्रवेश केला यावेळी शिवसेना जिल्हाप्रमुख परमेश्वर सातपुते सर यांनी त्यांचे



शिवसेना परिवारामध्ये स्वागत करून पुढील कार्यासाठी त्यांना बीड जिल्हा शिवसेनेच्या वतीने शुभेच्छा दिल्या. याप्रसंगी शिवसेनेचे उपजिल्हाप्रमुख आजिनाथ जी खेडकर, शिरुर चे तालुका प्रमुख सोपान काका मोरे, दीपक घोडके पाटील सह सर्व उपस्थित होते..!!



**माजी मंत्री तथा बीड जिल्हा शिवसेनेचे सहसंपर्कप्रमुख बदामराव आबा पंडीत व शिवसेना जिल्हाप्रमुख परमेश्वर सातपुते सर, जिल्हाप्रमुख गणेश भाऊ वरेकर यांच्या प्रमुख उपस्थितीत आज नामलगाव गणपती मंदिर येथे बहिरवाडी,पेंडगाव,माळापुरी सर्कल मधील शिवसेना पदाधिकारी व शिवसैनिक, कार्यकर्त्यांची संवाद बैठक मोठ्या उत्साहात पार पडली. यावेळी युवा नेते रोहित भैय्या पंडित, माजी सभापती पंढरीनाथ बापू लगड,उपजिल्हाप्रमुख हनुमान जिजा जगताप,उपजिल्हाप्रमुख राजूभाऊ महूवाले, विधानसभा प्रमुख सुशील भैय्या पिंगळे,शहर प्रमुख शेख निजाम भाई, तालुका प्रमुख गोरख आण्णा सिंघण, पत्रकार दिनकर शिंदे पाटील,महिला आघाडीच्या बीड विधानसभा प्रमुख मिराताई नवले, आनंदवाडी माजी सरपंच आशाताई कानडे, युवासेनेचे गेवराई शहर प्रमुख शेख सिराज भाई, सखाराम तात्या मोहिते, नागेश धट,तय्यब भाई पठाण, हनुमान सिरसाट, दीपक घोडके पाटील सह शिवसेनेचे सर्व आजी-माजी पदाधिकारी व शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते..!!**

## तलवाडा च्या ग्रामपंचायत मध्ये ग्रामविकास अधिकारी येईना रहिवासी प्रमाणपत्र सही साठी पंधरा-वीस दिवस वाट पहावी लागते

### अशा ग्रामसेवकाला गडचिरोलीत बदली करा, संतप्त नागरिकांचा सवाल

सुमेध करडे ।तलवाडा

गेवराई तालुक्यातील तलवाडा ग्रामपंचायत येथे ग्रामविकास अधिकारी पाटील हे येत नसून सामान्य जनतेचे कामे खोळंबली असून गेवराई ते खाजगी ऑफिस खोलून दलाला मार्फत काम चालू असल्याची चर्चा होताना दिसून येत असून अशा ग्रामसेवकाची बदली गडचिरोली सारख्या जिल्ह्यात करण्याची मागणी सामान्य जनतेतून होत आहे

याबाबत सविस्तर माहिती अशी की, गेवराई तालुक्यातील तलवाडा गावात सतरा सदस्याचे ग्रामपंचायत तालुक्यात सर्वात मोठी मानली जाते गाव मोठे असल्यामुळे गावाचा कारभार देखील ग्रामपंचायत मार्फत चालतो तलवाडा या गावची ग्रामपंचायत नेहमी कुठल्या ना कुठल्या विषयाने चर्चेत असते आता तर मात्र तलवाडा ग्रामपंचायतला ग्राम विकास अधिकारी पाटील काही महिन्यापूर्वी रुजू झालेले आहेत जेव्हापासून महाशय रुजू झालेले आहेत रहिवासी घ्यायला सुद्धा दहा वेळेस विचार करावा लागत आहे एवढेच नाही तर ग्रामपंचायतला कोणाची वचक नसल्यामुळे




कुणी कुठेही आणि कसेही काहीही करत आहे पाटील यांनी तर शासकीय कार्यालय सोडून गेवराई या ठिकाणी स्वतःचे ऑफिस उघडून त्या ठिकाणी येतात तिथूनच दलाला मार्फत कारभार चालत असून सर्व सामान्य जनता अशा ग्रामसेवकामुळे अडचण निर्माण झाले आहे तसेच या ग्रामसेवकाने तर गेवराईत बसून बोगस कामाचा सपाटा सुरू केला आहे ग्रामपंचायत कार्यालयात गेल्यावर साहेबाची खुर्ची रिकामीच असते तर तेथील एक शिपाई तसेच क्लर्क हे दोघेच आढळून येतात तर मात्र सहीसाठी ग्रामस्थांना मोठी कसरत करावी लागते १७ सदस्य असलेली ग्रामपंचायत एकही सदस्य या ग्रामसेवकाविषयी आवाज उठवत नसल्यामुळे आश्चर्य व्यक्त केले जात आहे गावातील एखाद्या सामाजिक कार्यकर्त्यांनी पुढे येऊन अशा ग्रामसेवकाचा बंदोबस्त करण्यात यावा व हा ग्रामसेवक गडचिरोली ला कसा जाईल असे निवेदन तयार करून त्या ठिकाणी पाठवण्यात यावा व तलवाडा गावाला एकांदा कर्तव्यदक्ष ग्राम विकास अधिकारी नियुक्त करावा अशी मागणी ग्रामस्थातून होत आहे

### माजी आमदार अमरसिंह पंडित यांनी लक्ष द्यावे.

तलवाडा ग्रामपंचायत १५ ते वीस वर्षापासून अडवोकेट सुरेशराव हत्ते यांच्या ताब्यात तलवाडा करांनी एक हत्ती ग्रामपंचायत देत होते मात्र आता ही ग्रामपंचायत अमरसिंह पंडित साहेबांच्या ताब्यात आहे अमरसिंह पंडित हे सर्व क्षेत्रातील विकास कामात त्यांना दांडगा अभ्यास असून मात्र आज त्यांच्याच ताब्यात असलेल्या ग्रामपंचायत ला असा दांडी बहादर ग्रामसेवक लागल्यामुळे लोकांचे काम अडकून बसले आहेत तरी अशा ग्रामसेवकाचा त्यांनी लोकांचे अडचण लक्षात घेऊन बंदोबस्त करावा अशी मागणी मतदारातून होताना दिसून येत आहे



बीड : माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू असलेल्या होम मिनिस्टर चंपावती सम्राज्ञी कार्यक्रमाला गुरूवार दि.२० रोजी प्रभाग क्र.२ मधील महिला-भगिनींची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# रमाई प्रायमरी स्कूलमध्ये आरोग्य तपासणी शिबीर संपन्न

परळी ।प्रतिनिधी

शहरातील रमाई प्रायमरी स्कूलमध्ये विद्यार्थ्यांसाठी आरोग्य शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. यास विद्यार्थ्यांचा मोठा प्रतिसाद मिळाला. येथील रमाई प्रायमरी स्कूल येथे डॉ दिनेश लोढा यांच्या उपस्थितीत शुक्रवारी (दि.२०) विद्यार्थ्यांची दंत चिकित्सा व विद्यार्थ्यांना दातांची काळजी कशी घ्यावी यासंदर्भात मार्गदर्शन करण्यात आले. कार्यक्रमास संस्थेचे अध्यक्ष संजय देशमुख, सामाजिक कार्यकर्ते प्रितम बोरा उपस्थित होते. यावेळी डॉ दिनेश लोढा




यांनी विद्यार्थ्यांना आपल्या दातांची काळजी घेण्यासाठी काय केले पाहिजे यासंदर्भात प्रँक्टीकल दाखवून सविस्तर माहिती दिली. तसेच दिवसातून दोन वेळा ब्रश केला पाहिजे यामुळे दाताचे आरोग्य चांगले राहते, आतापासूनच विद्यार्थ्यांना याची सवय लागली पाहिजे कारण पुढे मोठ्या प्रमाणावर दातांचे आजार होण्याची शक्यता असते यामुळे काळजी घेणे आवश्यक आहे. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्राचार्या ऋतू देशमुख व शाळेच्या शिक्षकांनी प्रयत्न केले. यावेळी शाळेतील

# परळी महावितरणात वीज बिल भ्रष्टाचार प्रकरणी तक्रार देऊन दखल नाही!

## २० दिवसांत कारवाई का नाही? स्थानिक अधिकाऱ्याचे सगणमंत आहे का?

परळी ।प्रतिनिधी


परळी महावितरण कार्यलयात वीज बिल वितरण प्रकरणात परळी कार्यलयाने ज्या एजन्सीला वीज बिल वितरण करण्याचे कार्यरभ आदेश दिले होते त्या एजन्सीने बिल वितरण पत्रक बाजारात रद्दी दुकानात विकून मोठा भ्रष्टाचार केला होता आणि परळी वीज ग्राहकासह परळी महावितरण कार्यलयाची मोठी फसवणूक केली असल्याचे उघड झाले होते म्हणू त्या एजन्सीला कायम काळया यादीत टाकून ज्या कोणी संबंधित अधिकारी या मध्ये शामिल असल्यास निलंबनाची कारवाई करावी अशी तक्रार ३१ / ८/२०२४ रोजी विभागिय कार्यलयात आणि परळी कार्यलयात केली असून तक्रार करून वीस दिवस उलटून गेले आहेत मात्र कोणत्याही कार्यलयाने कसलीही कारवाई केली नसल्याने परळीत वीज ग्राहक आणि तक्रारदार यांनी स्थानिक अधिकारी सगणमंत आहे का अशी चर्चा करत आहेत तेव्हा आठ दिवसांत या एजन्सीवर कारवाई केली नाही तर वरिष्ठां कडे औरंगाबाद आणि मुबई ठिकाणी समक्ष भेट देऊन तक्रार आणि जो काही भ्रष्टाचार केल्याचा दस्तावेज असेल तो समक्ष देऊन कारवाई करावी अशी विनंती आणि परळी कार्यलयाचा मासिक लेखाजोखा घ्यावा अशी तक्रार आणि विनंती करणार असल्याचे तक्रारदार यांनी म्हंटले आहे वीस दिवसात का कारवाई केली नाही आणि त्या एजन्सीवर कार्यलयात बंदी घातली नाही याची सुद्धा माहिती वरिष्ठांना द्यावी लागणार आहे तेव्हा आठ दिवसांत त्या एजन्सीवर करावी करावी अशी पुन्हा तक्रारदार यांनी मागणी केली आहे.....

# विश्वविद्या हा आयटी डोमेनमधील तरुण-तरुणींसाठी देशातील सर्वात मोठा प्लॅटफॉर्म - अॅड. शंकर चव्हाण यांचं प्रतिपादन

पुणे ।प्रतिनिधी

श्वविद्या हा आयटी डोमेनमधील तरुणांसाठी देशातील सर्वात मोठा प्लॅटफॉर्म आहे असे प्रतिपादन ड. शंकर चव्हाण यांनी पुणे येथे विश्वविद्या या संस्थेच्या एका विशेष कार्यक्रमादरम्यान केले. ते पुढे म्हणाले की, प्रामुख्याने मोठया प्रमाणात रोजगारक्षमता वाढविण्याच्या उद्देशाने देशातील सर्वात मोठा हा प्लॅटफॉर्म आहे असं म्हटलं तर वावगं ठरु नये. कारण देशातलं मोठा आयटी हब असलेल्या पुणे महानगरात गेल्या कित्येक वर्षापासून अगदी निशुल्क असा कौतुकास्पद व सामाजिक हित जोपासत सुरु झालेला व तरुणांसाठी विशेष करुन आयटी क्षेत्रात करिअर करणाऱ्या नोकरी करु इच्छिनाऱ्या उमेदवारांसाठी हा उपक्रम होय. विश्वविद्या हा ओम एज्युकेशन फाऊंडेशन ट्रस्ट चा एक उपक्रम आहे, सन २०१० मध्ये नोंदणीकृत ट्रस्ट म्हणून



करण्यात आली होती. सदर संस्थेच्या स्थापनेपासून, ट्रस्टने प्रामुख्याने रोजगारक्षमता वाढविण्याच्या उद्देशाने उपक्रम राबविण्यासाठी अथक प्रयत्न केले आहेत व आजही अगदी सातत्य ठेवून पुढे वारसा सुरुच आहे. खरंतर या माध्यमातून, लाखो तरुणांच्या जीवनावर त्याचा सकारात्मक परिणाम झालेला दिसून येतो. खडतर प्रवासामधून जाणाऱ्या तरुणांना योग्य दिशा देण्याचं काम विश्वविद्या ही संस्था अगदी निशुल्क सेवा पुणे सारख्या आयटी हब असलेल्या शहरात प्रदान करत आहे हे खरंच खुप मोठं सामाजिक कार्य असल्याचंही ते प्रसंगी बोलत होते.

विश्वविद्या हा एक सामाजिक कार्यक्रम आहे जो बेरोजगारी आणि पूर्ण करिअरमधील अंतर कमी करण्यासाठी समर्पित आहे. विश्वविद्या अशा भविष्याची कल्पना करतो जिथे प्रत्येक बेरोजगार व्यक्तीला परिपूर्ण आणि शाश्वत रोजगार मिळविण्याची संधी आणि समर्थन असेल. मार्गदर्शक, व्यवसाय आणि व्यक्ती यांच्यातील सहकार्याद्वारे, विश्वविद्या ही संस्था एक भरभराट करणारे कर्मचारी आणि मजबूत समुदायासाठी कार्य करते.

विश्वविद्या - करिअर मार्गदर्शनासोबत आयटी क्षेत्रात करिअर करणारांसाठी ही भविष्य उज्वल करण्यासाठी खुप मोठी संधी असल्यामुळे त्या संधीचं सोनं तरुण-तरुणींनी करावं असंही ड. शंकर चव्हाण प्रसंगी बोलत होते. आजच्या स्पर्धात्मक जगामध्ये शैक्षणिक गुणवत्तेबाबत जॉब मिळण्यासाठी डोमेन नॉलेज आवश्यक आहे आणि हे मिळण्यासाठी प्लॅटफॉर्म उपलब्ध नाहीत .विश्वविद्या तरुण-तरुणींना विविध आयटी डोमेन मधील तज्ञ लोकांना एकत्र आणून त्यांचं ज्ञान आणि अनुभव मिळवून देण्यासाठी कृतिशील आहे.सर्वात महत्वाचे म्हणजे यांसाठी विश्वविद्या कुठल्याही प्रकारचं शुल्क आकारत नाहीत.

विश्वविद्या कसं काम करते ?

विश्वविद्या प्लॅटफॉर्मच्या केंद्रस्थानी योग्य मार्गदर्शन आहे जे तरुण-तरुणींना पुस्तक आणि ऑनलाईन कोर्सेस च्या पलीकडे जावून प्रत्यक्ष प्रोजेक्ट चा अनुभव देण्यामध्ये जास्त विश्वास ठेवते. विश्वविद्या प्लॅटफॉर्म नॉलेज आणि जॉब या मधील अंतर कमी करण्यामध्ये जास्त विश्वास ठेवते. आत्तापर्यंत शेकडो मुलांना या प्लॅटफॉर्म द्वारे जॉब मिळाला आहे. तर तरुण-तरुणींनी संधीची वाट पाहू नका तर ती निर्माण करा.आजच विश्वविद्यामध्ये सामील व्हा आणि योग्य मार्गदर्शनासह तुमच्या पूर्ण क्षमतेचा वापर करून जॉब योग्य व्हा. अधिक माहिती साठी ळपर्षोंळीहीर्रीळवूर.लो वरती संपर्क करा किंवा+९१ ८९५६० २८३१४ वर कॉल करा. तुमचं भविष्य आजच घडवा...ु.तळीहीर्रीळवूर.लो

# हिमायत फाउंडेशन गोरगरीब रुग्णावर मोफत उपचार करणार - मुक्ती उमर

गेवराई येथील सामाजिक क्षेत्रात अग्रेसर असणारे हिमायत फाउंडेशनच्या वतीने हाफिस दवाखान्याच्या माध्यमातून गोरगरीब रुग्णांवर मोफत उपचार करण्यात येणार असल्याची माहिती फाउंडेशनचे अध्यक्ष मुक्ती उमर कुरेशी यांनी दिली. याबाबत माहिती देताना ते म्हणाले की आत्तापर्यंत आम्ही लोक सहभागातून हिमायत फाउंडेशनच्या माध्यमातून गंभीर आजार असलेल्या रुग्णांना मदत केली असून हे कार्य यापुढेही अखंडितपणे सुरू राहणार आहे जातीपातीचे बंधन तोडून सर्व समाजासाठी विविध समाजोपयोगी उपक्रम राबविण्यात येणार आहेत.

गेवराई शहरातील कोल्हे रोडवरील बेदरे लॉन्सच्या पाठीमागे असलेल्या डॉ. शोएब खान मुस्तफा खान यांच्या हाफिज दवाखान्याच्या माध्यमातून हिमायत फाउंडेशनच्या वतीने आर्थिक ऐपत नसणाऱ्या गोर-गरीब रुग्णांवर आयुर्वेदिक पद्धतीने मोफत उपचार करण्यात येणार आहेत. याबाबत फाऊंडेशनचे अध्यक्ष मुक्ती उमर कुरेशी , जेष्ठ



पत्रकार काझी अमान उपाध्यक्ष सय्यद सोहेल सचिव शेख मुजीब व शेख ईजहार यांनी बुधवार दिनांक १८ सप्टेंबर २०२४ रोजी दुपारी हाफिज दवाखान्यात जाऊन डॉक्टर शोएब खान यांच्याशी सविस्तर चर्चा केली. डॉक्टर खान हे पुणे जिल्ह्यातील जुन्नर येथील रहिवासी असून ते गेल्या सात वर्षापासून गेवराई येथे दवाखाना चालवितात बीएससी झाल्यानंतर त्यांनी औरंगाबाद येथील रुरल नॅचरपॅथी ऑर्गनायझेशन मध्ये तिब्बे जदीद म्हणजे डिप्लोमा मेडिशनल हरबरीझम (डी.एम.एच.) चे शिक्षण पूर्ण केले. हृदयविकार, पॅरलिसिस, ब्रेन ट्युमर यासह सर्व जुन्या व नवीन आजारावर त्यांच्या दवाखान्यात आयुर्वेदिक पद्धतीने उपचार केले जातात.

आतापर्यंत हजारो रुग्णांना लाभ झाल्याचे त्यांनी सांगितले. हिमायत फाउंडेशन च्या वतीने गोरगरीब रुग्णांना मदत करण्यात येत असल्याचे पाहून मी त्यांच्या कार्याचे प्रभावित होऊन हिमायत फाउंडेशन मार्फत येणाऱ्या गोर-गरीब रुग्णांवर मोफत उपचार करण्याचा निर्णय घेतल्याचे हाफिज दवाखान्याचे डॉक्टर शोएब खान यांनी सांगितले.



पेटली चीता संपली कथा!!

# समाजसेवक बंडूभाऊ बारगजे यांचे अपघाती निधन.

बीड ।प्रतिनिधी

समाजसेवक, बंडुभाऊ बारगजे रा.वडगावढोक ता.गेवराई.जिल्हा बिड यांचे आज सकाळी प्रवासादर्म्यान बस आणि आयसर चा बिड - जालना हायवे वर समोरा समोर जोरदार धडक होऊन बस मधील तब्बल सहा आणि आयसर मधील दोन असे एकूण टोटल आठ जणांचा जागीच मृत्यू झाला असून, बस मधील सतरा प्रवाशी गंभीर जखमी झाली आहेत,ही घटना शुक्रवारी सकाळी ८:३० च्या दरम्यान घडली आहे,या अपघातामध्ये मद्ये एक प्रेमळ आणि अतिशय इमानदार माणूस,समाजसेवक बंडू भाऊ बारगजे वय ५२ वर्ष यांचा जागीच मृत्यू झालेली घटना समोर आली तेव्हा, हजारो लोकांच्या डोळ्यात अश्रू अनावर झाले, बंडूभाऊ बारगजे यांच्या अपघाती निधनामुळे बारगजे परिवार पोरका झाला, ते म्हणतात नियती पुढे कोणाचं चालत नाही तस आज बारगजे परिवारासोबत घडले, ही घडलेली घटना बारगजे परिवारासाठी आणि समस्त गेवराईकरांसाठी दुःखाची आणि कधी न भरून येणारी गोष्ट आहे, या परिवारावर आज दुःखाचा डोंगर कोसळलेला आहे तो कधी न संपणार आहे, गेवराई करांनी एक सच्चा इमानदार माणूस गमावला याची खंत गेवराईकरांना नक्कीच असेल, संघटनेचा आक्रमक वाघ हरपल्याने आज बीड जिल्ह्यामध्ये हळ हळ व्यक्त केली जात आहे.आज गेवराई मधील बीड बायपास येथे बारगजे यांच्या शेतामध्ये एस.टी. कामगार संघटना अध्यक्ष बीड विभाग.बंडूभाऊ बारगजे यांचा अंत्यविधी संपन्न झाला, या अंत्यविधीला हजारो पुरुष हजारो महिलांचा समावेश होता, बारगजे परिवाराच्या दुःखात संपूर्ण बिड जिल्हा सहभागी आहे. असे म्हणत अनेकांनी बंडूभाऊ बारगजे यांना भावपूर्ण आदरांजली वाहिली.

# आहेर लिंबगाव येथील तरुण अल्पभूधारक शेतकऱ्याची आत्महत्या

**बीड (प्रतिनिधी)**

**तालुक्यातील आहेर लिंबगाव येथील एका तरुण अल्पभूधारक शेतकऱ्यांनी आत्महत्या केली. रवींद्र दिलीप धुमाळ (वय २१ वर्ष) असे त्या तरुण शेतकऱ्याचे नाव आहे. बीड तालुक्यातील आहेर लिंबगाव येथील रवींद्र दिलीप धुमाळ यांना वडिलोपार्जित दोन एकर जमीन आहे. ते आपल्या परिवाराचा उदरनिर्वाह शेती व मजुरी करून करत होते.**

परंतु सततच्या नापिकी आणि कर्जबाजारीपणाला कंटाळून या तरुण शेतकऱ्याने मंगळवार दिनांक १७ सप्टेंबर रोजी आपल्या राहत्या घरी दुपारी ०३ वाजता गळफास घेऊन आत्महत्या केली. तरुण शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्याची माहिती मिळताच बीड ग्रामीण पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. त्यानंतर मयत



तरुणाचे प्रेत खाली घेऊन बीड रुग्णालयात दाखल केले. जिल्हा रुग्णालयात शवविच्छेदन करण्यात आले. या मयत तरुण शेतकऱ्याच्या पश्चात वडील दिलीप तुकाराम धुमाळ आणि वयोवृद्ध आजी जिजाबाई तुकाराम धुमाळ आहेत.




# परळीच्या विविध नागरी समस्या बाबत अँड.मनोज संकाये यांची जिल्हाधिकाऱ्यांशी सकारात्मक चर्चा; निवेदन सादर!

परळी (प्रतिनिधी)

परळी शहरातील विविध नागरी समस्या बाबत आणि परळीकरांच्या जिव्हाळ्याच्या प्रश्नसंदर्भात बीड जिल्ह्याचे जिल्हाधिकारी श्री. अविनाश पाठक साहेब यांच्याशी सकारात्मक चर्चा केली तसेच याबाबत निवेदन मित्र मंडळाच्या वतीने सामाजिक कार्यकर्ते अँड.मनोज संकाये यांनी निवेदन सादर केले. निवेदन सादर करता वेळी परळी नगरपालिकेची मुख्याधिकारी त्रिंबक कांबळे साहेब उपस्थित होते त्यांना जिल्हाधिकारी साहेबांनी काम त्वरित मार्गी लावण्याच्या सूचना दिल्या.


निवेदनात म्हटले आहे की, परळी शहरातील अवजड वाहनांची वाहतूक टोकवाडी जिरेवाडी बायपास मार्गे करावी, वैद्यनाथ मंदिर परिसरात अवजड वाहनांची वाहतूक व रहदारी रोखण्यासाठी कायमस्वरूपी लोखंडी फाटक बसविणे आणि गेल्या सहा महिन्यापूर्वी मंजूर झालेला रेल्वे उड्डाणपुलाखाली ट्रान्सपोर्ट रस्त्याचे काम त्वरित सुरू करावी आदी जिव्हाळ्याच्या मागण्यांचे निवेदन जिल्हाधिकारी यांना सादर केले तसेच त्यांच्यासोबत सकारात्मक चर्चा केली. वरील विषयासंदर्भाने वेळोवेळी नगरपालिकेचे मुख्याधिकारी तसेच परळी पोलीस स्टेशनचे पी.आय यांना निवेदने असंख्य कार्यकर्त्याचा उपस्थितीत सादर केले परंतु त्याकडे सबसेल दुर्लक्ष करण्यात आले. वरील सर्व विषय हे बीड जिल्ह्याचे जिल्हाधिकारी यांच्या आखात्यरित्या येत असल्यामुळे आपण या विषयासंदर्भात गांभीर्यपूर्वक लक्ष घालून मागण्यांचा सकारात्मक विचार करून मार्गी लावाव्यात अशी विनंती त्यांनी केली. निवेदनाच्या प्रति मा. धनंजय मुंडे साहेब कृषिमंत्री तथा पालकमंत्री बीड, उपजिल्हाधिकारी साहेब कार्यालय परळी वैजनाथ, परळी नगरपालिकेचे मुख्याधिकारी साहेब आणि तहसीलदार साहेब कार्यालय परळी वैजनाथ यांना मेलद्वारे पाठविण्यात आल्या आहेत. यावेळी अनिल चौधरी, शिरीष सलगरे, काशिनाथ सरवदे, संतोष चौधरी आदी उपस्थित होते.

# गयरान हक्कासाठी व मूलभूत प्रश्नावर हजारोच्या संख्येने लाँग पाई मोर्चा सहभागी व्हावे - शैलेंद्र पोटभरे

बीड (प्रतिनिधी)

गायरान जमीन व मूलभूत मागण्यांसाठी बीड जिल्हाधिकारी कार्यालयावर रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचे राष्ट्रीय नेते नानासाहेब इंदीसे यांच्या नेतृत्वाखाली जिल्हाधिकारी कार्यालयावर भव्य हजारो बांधवांचा मोर्चा निघत आहे. यामध्ये बीड जिल्ह्यातील संपूर्ण गायरान जमिनीचा प्रश्नासाठी लढणाऱ्या व व इतर मागण्यांच्या संबंधी सहभागी व्हावे असे आव्हान रिपाई ऐकतावादीचे मराठवाडा अध्यक्ष शैलेंद्र पोटभरे यांनी केले आहे.

मोर्च्याच्या प्रमुख मागण्या पुढील प्रमाणे आहेत.गायरान धारकाच्या नावे व भोगवाटा धारक यांच्या नावे मालकीची पीटीआर देण्यात यावी. रमाई व पतंप्रधान घरकुल ५ लक्ष रुपये करण्यात यावे. साहित्य रत्न आण्णाभाऊ साठे यांना भारतरत्न देण्यात यावा. सर्व मागासवर्गीय महामंडळाचे कर्ज माफ करण्यात यावेत. डॉ. बाबासाहेब आंबेडकर सबलिकरण सिंचन विहिरीचा निधी ५ लक्ष रुपये करण्यात यावा. इंदुमितचे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मरकाचे काम तात्काळ चालु करण्यात यावे. येवता केज बाळु गायकवाड या बालकास चॉकलेट साठी मारहाण करणाऱ्या आरोपीस तात्काळ आटक करुन कठोर शिक्षा करण्यात यावी. अनुसुचित जाती जमातीतील भुमीहीनांना ५ एकर सरकारी जमिन देण्यात यावी. विद्यार्थ्यांची शिष्यवृत्ती वाढ करुन दर महिना त्यांच्या खात्यामध्ये जमा करण्यात यावेत. शेतकऱ्यांना सरसकट ५० हजार हेक्टरी नुकसान भरपाई देण्यात यावी. व शेतकऱ्यांच्या खात्यात पिकविम्याची रक्कम तात्काळ जमा करण्यात यावा. महिलांना व्यवसायासाठी सरकारने ५ लाख रुपये कर्ज देण्यात यावेत, घरकुल लाभाथ्यर्थ्यांना ५ ब्रास वाळु मोफत देण्यात यावी. श्रावण वाळ योजनेच्या मानधन दर महिना लाभ धारकांच्या खात्यामध्ये जमा करण्यात यावेत. मागसवर्गीय विद्यार्थ्यांचे १० वी च्या पुढील नेट शिक्षण मोफत करण्यात



यावेत. ऊसतोड मजूरांना माथाडी बोर्ड लागू करण्यात यावा. रेशनची डाटा इंन्ट्री चातु करून नवीन कार्ड धारकांना राशन देण्यात यावे. बेघरांना घरकुल देण्यात यावे. विविध मागण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालय, बीड या कार्यालया समोर दिनांक २७/०९/ २०२४ रोजी पायी लाँग मोर्चा काढत आहोत. यात मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन मराठवाडा अध्यक्ष शैलेंद्र पोटभरे यांनी केले आहे.



किल्ले धारूर / रोहित फावडे

महाराष्ट्र विधान सभा निवडणूका जवळ येऊन ठेपल्या आहेत.निवडणूक लढवण्यास ईच्छूक असलेले उमेदवार व पक्षांतील नेते मंडळींच्या भेटींचा सिलसिला वेगात चालू आहे. मुंबई येथील यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानच्या कार्यालयात संसदरत्न खा.सुप्रियाताई सुळे व माजलगाव विधान सभा निवडणूक लढवण्यास ईच्छूक असलेले प्रा.ईश्वर आनंदराव मुंडे यांची दि.२० सप्टेंबर २०२४ शुक्रवार रोजी भेट झाली.भेटी नंतर माध्यम प्रतिनिधींशी बोलताना प्रा.ईश्वर मुंडे म्हणाले की,माजलगाव विधानसभा निवडणूक संदर्भात आपले गाव भेट दौरे,पक्ष संघटना बांधणी,मतदार संघाचे सामाजिक समिकरण या बाबींवर सविस्तर चर्चा झाली.पक्षाने संधी दिल्यास आपण माजलगाव विधान सभा मतदार संघातून निवडणूक लढू व जिंकू असे मनोगत व्यक्त केल्याचे प्रा.ईश्वर मुंडे यांनी सांगितले. आपल्या उमेदवारीचा गांभिर्याने विचार करून लवकरच निर्णय कळवू असे खा.सुप्रियाताई सुळे यांनी म्हटल्याचे प्रा.ईश्वर मुंडे यांनी सांगितले.



मुंबई : राष्ट्रवादी काँग्रेसचे (शरद पवार गट) नेते तथा माजी मंत्री आ.जितेंद्र आव्हाड यांची निवडणुकीच्या पाश्वभुमीवर सदिच्छा भेट घेतली या प्रसंगी आव्हाड यांचा रासपाचे राजेभाऊ फड यांनी सत्कार केला. या प्रसंगीचे छायाचित्र

# बीड येथील विप्रनगर (ब्राह्मण वाडी) होम मिनिस्टर स्पर्धेला महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद/ रिस्पॉन्स

बीड ।प्रतिनिधी

दि.२०/०९/२०२४ माजी मंत्री जयदत्त अण्णा क्षीरसागर यांच्या संकल्पनेतून काकू-नाना प्रतिष्ठान आयोजित होम मिनिस्टर चंपावती सम्राज्ञी २०२४ खेळ पैठणीचा हा कार्यक्रम बीडच्या विप्रनगर ब्राह्मणवाडी प्रभाग क्रमांक तीन या भागातील महिलांचा अलोट प्रतिसाद पाहून आबाल वृद्ध भगिनी भारावून गेल्या. या स्पर्धेचे उद्घाटन सौ.विजयाताई अशोक शेटे यांच्या हस्ते करण्यात आले याप्रसंगी महिला आघाडीच्या अध्यक्ष सौ.जयश्रीताई विधाते शोभाताई एकशिंगे, कमलताई क्षीरसागर, सौ.चित्राताई महाजन ,सौ.प्रियाताई रोशन बंब, सौ. शारदाताई राजेभाऊ बनसोडे, सौ.सोनलताई अरविंदसिंग पाटील, सौ.सुशीलाताई नरसिंग नाईकवाडे, सौ.शारदाताई डुगलज, सौ.वर्षाताई मेहत्रे, सौ. भारतीताई राजेश क्षीरसागर,सौ. कीर्तीताई पांगारकर, सौ. अर्चनाताई पांगारकर प्रमुख महिलांच्या उपस्थितीत व रामबीलास जी सोहणी, श्री पद्माकर कुलकर्णी, नारायणदासजी तोष्णीवाल, देविदास राव एकशिंगे वसंतराव गर्जे या प्रमुख कार्यकर्त्यांच्या उपस्थितीत या स्पर्धेचे उद्घाटन झाले. या या होम मिनिस्टर स्पर्धेला महिलांचा इतका प्रतिसाद होता की, महिलांनी खूप मोठ्या प्रमाणात उस्फुर्त प्रतिसादातून ही स्पर्धा यशस्वी केली.




होम मिनिस्टर संपावती सम्राज्ञी २०२४ खेळ पैठणीचा ही स्पर्धा प्रसिद्ध निवेदक सुरेश साळुंखे यांच्या बहारदार व विनोदी शैलीने स्पर्धेत रंगत आणली . या स्पर्धेचा अंतिम निकाल प्रथम पैठणी विजेती महिला सौ. सौ रंजनाताई रामभाऊ लांडे या ठरल्या ,द्वितीय बक्षीस इमिटेशन ज्वेलरीच्या मानकरी सौ. रूपाली अमित शेटे तृतीय बक्षीसच्या मानकरी सौ. भाग्यश्री रवींद्र राऊत या ठरल्या तर उर्वरित सात महिलांना आकर्षक गिफ्ट हॅम्पर देण्यात आले. यामध्ये सौ. रेखा निलेश मालपाणी सौ. सोनिया शुभम सिकची,सौ.दिपाली दयानंद ढोबळे, सौ. अर्चना प्रसाद देवळे सौ. सुनिता संभाजी रसाळ, सौ. अंजली राहुल बादाडे , सौ कमल लक्ष्मण कदम या महिला

७ ऑक्टोबर रोजी होणाऱ्या अंतिम फेरी करिता या सर्व महिलांची निवड झाली. मान्यवरांच्या हस्ते पारितोषिक वितरण करण्यात आले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी परिसरातील कार्यकर्ते नगरसेवक व नागरिक यांनी परिश्रम घेतले.

विद्यार्थ्यांच्या विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाचे एकमेव सर्वांगीण विकासाचे

# एकमेव बौद्धिक तंत्रज्ञान म्हणजेच अबॅकस होय माननीय मंत्री तथा पालकमंत्री धनंजय मुंडे साहेब

वर्ल्ड अबॅकस चॅम्पियनशिपमध्ये सर्वोत्कृष्ट प्रॉडिजी परफॉर्मन्स ट्रॉफी आणि अबॅकस स्पर्धक मानद साईटेशन मिळवल्याबद्दल साई पूरणदास रोटीचे माननीय पालकमंत्री धनंजय मुंडे यांच्या हस्ते हार्दिक सत्कार

बीड (प्रतिनिधी) माननीय मंत्री तथा पालकमंत्री श्री धनंजय मुंडे साहेब यांनी अबॅकस म्हणजेच विद्यार्थ्यांचे विकासाची साधन आहे असे नमूद केले आहे. शालेय विद्यार्थ्यांचे विविध स्पर्धेमधूनच व्यक्तिमत्व घडत असते त्यांच्या योग्यतेप्रमाणे त्यांना शैक्षणिक वातावरण निर्मिती करून देणे आवश्यक आहे, शालेय स्तरावरील सर्वांगिन विकास करण्याच्या मार्गाने अबॅकस गणितीय पध्दतीचा उपयोग होतो. साई पुरणदास रोटेने जागतिक स्तरावरील अबॅकस चॅम्पियनशिपमध्ये सर्वोत्कृष्ट प्रॉडिजी परफॉर्मन्स ट्रॉफी मिळवून ऐतिहासिक यश मिळवलेले आहे. शहरातील अबॅकस ट्रेनिंग केंद्राद्वारे,



आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय , राज्य स्तरावर, अबॅकस चॅम्पियनशिप आयोजित केल्या जातात. सदरील जागतिक स्पर्धा नॉलेज वर्ल्ड संघटना तसेच स्किल डेव्हलपमेंट आणि इंटरनॅशनल स्तरावरील ऑनलाइन अबॅकस चॅम्पियनशिप आणि आंतरराष्ट्रीय अबॅकस असोसिएशन यांच्या सहकार्याने जागतिक स्तरावरील अबॅकस स्पर्धा ऑगस्ट २०२४ संपन्न झालेल्या असून त्यामधील जाहीर झालेल्या निकालाप्रमाणे साई पुरंदास रोटेने सर्वोत्कृष्ट प्रॉडिजी परफॉर्मन्स ट्रॉफी विनर प्रमाणपत्र मिळालेलं करिता श्री मा.धनंजय मुंडे साहेब मंत्री तथा पालकमंत्री यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला आहे. जागतिक स्तरावरील अबॅकस स्पर्धेमध्ये भारतासह, नेपाळ, श्रीलंका, यु एस ए , म्यानमार, श्रीलंका, न्युझीलँड, पनामा, इंडोनेशियाअशा जगातील दोन हजार विद्यार्थ्यांपैकी सहभाग असलेल्या अबॅकसच्या सीनियर कॅटेगिरी लेवलच्या स्पर्धेमध्ये साई पुरणदास रोटेची जागतिक स्तरावर निवड झालेली असून तसेच सुपर जिनियस विद्यार्थ्यांमध्ये साई पुरणदास रोटेची इंटरनॅशनल अबॅकस स्पर्धेमध्ये किड्स स्तरावरील प्रतिष्ठित समजले जाणारी अबॅकस इंटरनॅशनल स्पर्धेमध्ये उत्कृष्ट स्पर्धक निवड करण्यात आलेली आहे. साई पुरणदास रोटेने फक्त दहा मिनिटांमध्ये अगदी बरोबर गणिते सोडवून पैकीच्या पैकी मार्क्स मिळवून ऐतिहासिक विक्रम केलेला आहे. गेल्या चार ते पाच महिन्यापासून सतत प्रयत्न करत असल्यामुळे तसेच पालकांनी, शिक्षकांनी सतत योग्य ते मार्गदर्शन करून यश प्राप्त करण्यास सहकार्य केलेली आहे. अबॅकस स्टडी सेंटरचे प्रमुख तसेच इतर मान्यवरांनी सुद्धा साई रोटेचे अभिनंदन केले असून उज्वल भविष्यासाठी हार्दिक शुभेच्छा दिलेल्या आहेत. समाजातील सर्व स्तरांमधून साई रोटेचे, शाळेतील मुख्याध्यापक प्रशासकीय अधिकारी आणि नातेवाईक द्वारे अभिनंदन होत असून उज्वल भविष्यासाठी शुभेच्छा देण्यात येत आहेत असे त्याच्या वडिलांनी नमूद केले आहे.

अबॅकस आणि वैदिक मॅथमुळे विद्यार्थ्यांचा गणितामधील आवड निर्माण होऊन गणिताबद्दलची मनात असलेली भीती नष्ट होऊन अनेक क्लिष्ट अशा गणितीय पद्धती सोप्या पद्धतीने सोडवल्यासाठी विद्यार्थ्यांना आत्मविश्वास, स्मरणशक्ती यांचा विकास करण्यासाठी अबॅकसचा उपयोग केला जातो



# विजयसिंह पंडितांना आमदार करण्यासाठी आम्ही जिवाचे रान करू-आकाश सोनवणे

गेवराई:वार्ताहर

आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर गेवराई तालुक्यात सर्वपक्षीय कार्यकर्ते कामाला लागले आहेत. परंतु कुणी कितीही ताकद दाखवली तरी गेवराई तालुक्याचे आमदार विजयसिंह पंडित यांनाच करायचे आहे. यासाठी आम्ही जिवाचं रान करू अशी प्रतिक्रिया ठाकर आडगाव येथील राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे युवा नेते आकाश सोनवणे यांनी दिली आहे.गेवराई तालुक्यातील सर्व सामान्य जनतेच्या न्याय हक्कासाठी लढणारा, कार्यकर्त्यांसाठी जीवाला जीव देणारा, सोबत घेऊन चालणारा, कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करून नवी उर्जा देणारा नेता म्हणजे विजयसिंह पंडित हे आहेत. गत विधानसभा निवडणुकीत त्यांना थोड्या मताने पराभव स्वीकारावा लागला होता. परंतु पराभवाने खचून न जाता त्यांनी विकास कामांसह सर्वसामान्य जनतेची सेवा प्रामाणिकपणे केली आहे. माजी आमदार अमरसिंह पंडित यांच्या मार्गदर्शनाखाली विजयसिंह पंडित यांनी जनसेवेचा मोठा यज्ञ तालुक्यात उभारलेला आहे. त्यामुळे आगामी विधानसभा निवडणुकीत विजयसिंह पंडित

हेच आमदार होतील विश्वास आम्हा कार्यकर्त्यांना आहे. असा विजयसिंह पंडितांच्या विजयासाठी आम्ही जिवाचे रान करू. जनतेने देखील अहोरात्र जनतेच्या सेवेत असलेल्या विजयसिंह पंडित यांना साथ द्यावी असे आवाहन राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे युवा नेते आकाश सोनवणे यांनी केले आहे.

# मयुरी देवेंद्र राऊत यांच्या मृत्यूची चौकशी करुन दोषींवर कारवाई करा

गेवराई: दिवंगत मयुरी देवेंद्र राऊत (कर्पे), अधीक्षक (गट ब), महिला वस्तीगृह, जळगांव, तसेच त्यांचे पती देवेंद्र राऊत, जिल्हा कार्यक्रम अधिकारी, जिल्हा परिषद, जळगांव, यांना कार्यालयीन कामकाजाच्या ठिकाणी झालेल्या मानसिक छळाबाबतच्या त्यांच्या कुटुंबियांच्या तक्रारीची तात्काळ उच्चस्तरीय चौकशी करुन दोषींवर गुन्हे दाखल करण्यात यावे या मागणीसाठी महाराष्ट्र राज्य महिला व बालविकास विभाग राजपत्रित अधिकारी संघटनेकडून मुख्यमंत्र्यांना जिल्हाधिकारी बीड यांच्या मार्फत निवेदन देण्यात आले आहे.दिलेल्या निवेदनात त्यांनी म्हटले आहे की, महिला व बाल विकास विभाग गट ब (राजपत्रित) पदावर कार्यरत असलेल्या श्रीमती. मयुरी देवेंद्र राऊत (कर्पे), वय वर्ष ३२, यांचे




## महाराष्ट्र राज्य महिला व बालविकास अधिकारी संघटनेची निवेदनाद्वारे मागणी

हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले असून त्यांचे पती देवेंद्र राऊत, हे जिल्हा कार्यक्रम अधिकारी, जळगांव जिल्हा परिषद, जळगांव, गट अ (राजपत्रित) या पदावर कार्यरत आहेत. देवेंद्र राऊत यांना कामकाजाच्या ठिकाणी होणाऱ्या मानसिक त्रासामुळे मानसोपचार घ्यावे लागले व त्याचा प्रत्यक्ष अप्रत्यक्ष परिणाम हा त्यांच्या कुटुंबीयांवर झाल्याने त्यांच्या पत्नीचे निधन झाले आहे. वस्तुतः घडलेली घटना ही अत्यंत दुर्दैवी असून याबाबत उच्चस्तरीय चौकशीची आग्रही मागणी तीव्रतेने करण्यात येत आहे. याची दखल घेऊन वरील मागण्यांबाबत तात्काळ उचित कार्यवाही व्हावी. अन्यथा तीव्र आंदोलन छेडण्यात येईल. असा इशाराही निवेदनाद्वारे देण्यात आला आहे. निवेदनावर संघटनेचे अध्यक्ष संतोष भोसले, उपाध्यक्ष कालीदास बडे, सचिव डॉ.श्री. कैलास घोडके, सहसचिव रामेश्वर मुंडे, कोषाध्यक्ष सुहिता ओव्हाळ,

# बलात्कार केल्याप्रकरणी जामीन मंजूर- ॲड. तेजस नेहरकर

बीड (प्रतिनिधी)

घटनेची हकिकत अशी की, १५ वर्षीय अल्पवयीन मुलीवर बलात्कार केला. या प्रकरणी आरोपी सुनील सेतुळे रा. केज याच्यावर कलम १३७ (२), ३४ (२) (च्), ६५ (१) भारतीय न्याय संहिता सह कलम ४,५,(ङ),६ .८ बाळ लैंगिक अत्याचार प्रकरणी पोकसो ट्रॉसिटी क्ट सह कलम ३ (१) (), (ळ), ३ (१) (), (ळळ), ३ (२) (ीं) अनुसुचित जाती, जमाती प्रतिबंध कायद्यान्वये पोलिस स्टेशन पिंपळनेर येथे गुन्हा रजिस्टर नंबर २१९/२०२४ अनवये दिनांक ४/०९/२०२४ रोजी पीडितेच्या फिर्यादी वरून गुन्हा दाखल करण्यात आला होता. व पिंपळनेर पोलिस पथकाने गंभीर गुन्हा असल्यामुळे आरोपीला तात्काळ अटक केले होते. त्यानंतर आरोपीला जामीन मिळविण्यासाठी मा. न्यायालयात जामीन अर्ज ड. तेजस नेहरकर यांच्या मार्फत दाखल करण्यात आला होता. त्यावर आरोपीच्या बाजूने दिलेला भारी भक्कम पुरावा व अतिशय उत्कृष्ट व्यक्तिवाद ग्राह्य धरून व अटी व शर्तीवर आरोपीचा जामीन दिनांक १९/०९/ २०२४ रोजी मा.न्यायालयाने मंजूर केला आला आहे. आरोपीचे वतीने ड. तेजस सुभाष नेहरकर यांनी कामकाज पाहिले. या निकालाकडे बीड तालुक्यातील तसेच पिंपळनेर परिसरातील नागरिकांचे लक्ष लागुन होते.



# जरांगे पाटलांच्या समर्थनार्थ लिंबागणेश कडकडीत बंद :- डॉ.गणेश ढवळे

लिंबागणेश ।प्रतिनिधी

मराठा आरक्षण संघर्ष योध्दा मनोजजी जरांगे पाटील यांनी मराठा समाजाला ओबीसीतुन आरक्षण मिळावे यासाठी अंतरवली सराटी येथे सहाव्यांदा आमरण उपोषण सुरू केले असुन आज उपोषणाच ५ वा दिवस असुन त्यांची प्रकृती खालावली आहे.सरकारकडुन वारंवार मराठा आरक्षण बाबतीत शब्द देऊनही चालढकल करण्यात येत असुन मुख्यमंत्री, मंत्रीमंडळ दिलेल्या शब्दाला जागत नाहीत.त्यामुळे सगेसोयरे अधिसुचनेची अंमलबजावणी करा, हैदराबाद, मुंबई आणि सातारा गॅझेट लागु करा, अंतरवली सराटीसह राज्यात मराठा आंदोलनाच्या निमित्ताने दाखल गुन्हे मागे घेण्यात यावेत.मराठा आरक्षणासाठी बलिदान दिलेल्या कुटुंबातील सदस्यांना शासकीय नोकरीत सामावून घ्यावे.मराठा आणि कुणबी एकच असुन अध्यादेश पारित करून कुणबी प्रमाणपत्र देण्यात यावे या मागण्यांसाठी उपोषण सुरू केले असुन त्यांच्या समर्थनार्थ बीड जिल्हा बंदची हाक देण्यात आली असुन लिंबागणेश येथील सर्व बांधवांनी दुकाने बंद ठेवून उत्स्फूर्तपणे बंद मध्ये सहभाग घेतला. शिवतीर्थ याठिकाणी एकत्र जमा होत जरांगे पाटील यांच्या समर्थनार्थ लढेंगे जितेंगे हम सब जरांगे ,एक मराठा लाख मराठा जरांगे पाटील तुम आगे बढो हम तुम्हारे साथ है म्हणत जरांगे



पाटील यांची प्रतिमा घेऊन घोषणाबाजी केली. यावेळी लिंबागणेश पोलिस चौकीचे अंमलदार संतोष राऊत आणि बाबासाहेब डोंगरे यांच्या मार्फत पोलिस अधीक्षक बीड यांना लेखी निवेदन देण्यात आले.

कायदा व सुव्यवस्था सांभाळून शांतता राखत बंद पाळण्यात आला.यावेळी डॉ.गणेश ढवळे, बालासाहेब जाधव,कल्याण वाणी, विक्रांत वाणी, अक्षय वाणी,सुरेश ढवळे,अशोकराजे वाणी,अँड.गणेश वाणी, भगवान मोरे,बाळकृष्ण मुळे,अक्षय येडे, संजय सुकाळे,दामु थोरात, विनायक वाणी, संतोष भोसले,भरत वाणी, अमोल जाधव,आण्णा जाधव आदी सहभागी होते.

# संतप्त विनाअनुदानित शिक्षकांचा आत्मदहनाचा इशारा-आंदोलनाचा ५० वा दिवस

बीड ।प्रतिनिधी

गेल्या ५० दिवसांपासून शिक्षक उपसंचालक कार्यालय कोल्हापूर येथे राज्यातील सर्व जिल्ह्यांमधील हजारो शिक्षक वाढीव टप्प्याचा जी आर आणि आपल्या विविध मागण्यांसाठी आंदोलन करत आहेत. विनाअनुदानित, अंशतः अनुदानित शाळांमधील हे शिक्षक गेल्या ५१ दिवसांपासून आपल्या हक्कांसाठी आंदोलन करत आहेत. शिक्षणमंत्र्यांकडून वाढीव टप्प्याचा जी आर काढण्यात येईल, १८ तारखेला आपली कॅबिनेट आहे त्यावेळी निर्णय घेतला जाईल असे काही दिवसांपूर्वी सांगण्यात आले होते, परंतु ती झालीच नाही. काल एकोणीस तारखेला कॅबिनेट होईल अशी आशा असतानाच एकोणीस तारखेची कॅबिनेट ही रद्द झाल्याने सर्व शिक्षकांची घोर निराशा झाली असून आता सोमवार दि. २३ रोजी कॅबिनेट असल्याचे समजते.

अनेक दिवस कॅबिनेट बाबत चालढकल आणि या आंदोलनाकडे सरकारने फारसे लक्ष न दिल्याने हे शिक्षक संतप्त झाले आहेत. सरकारला आता या शिक्षकांनी मंगळवार दिनांक २४ सप्टेंबर २०२४ पर्यंत अल्टिमेटम दिला असून येत्या सोमवारी होणाऱ्या कॅबिनेट बैठकीत वाढीव टप्प्याचा आदेश जर निघाला नाही तर बुधवार दि. २५ सप्टेंबर २०२४ रोजी शिक्षण उपसंचालक कार्यालय कोल्हापूर येथे सामूहिक आत्मदहन करण्याचा इशारा या सर्व संतप्त शिक्षकांनी सरकारला दिला आहे. सदर आशयाचे निवेदन मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, शिक्षणमंत्री कार्यालय, जिल्हाधिकारी कोल्हापूर, पोलीस अधीक्षक कोल्हापूर, पोलीस निरीक्षक लक्ष्मीपुरी यांना देण्यात आले आहे.

विनाअनुदानित शाळांमधील या शिक्षकांना गेली अनेक वर्ष तुटपुंजा पगार मिळतोय. १२ जुलैला सरकारने अंशत: अनुदानित शाळांसाठी वाढीव टप्पा अनुदान जाहीर केले होते. पण या निर्णयाची अंमलबजावणी झाली नसल्याने या शिक्षकांनी आंदोलन तीव्र केले आहे. संपूर्ण महाराष्ट्रात या आंदोलक शिक्षकांची संख्या जवळपास ६७ हजार इतकी आहे. हक्काचे अनुदान मिळत नसल्याने हे सगळे शिक्षक बेमुदत आंदोलनासाठी बसले आहेत. या ५० दिवसांपैकी ११ दिवस विनाअनुदानित शिक्षकांनी शिक्षण उपसंचालक कोल्हापूर कार्यालयासमोर आमरण उपोषण केले आहे. जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा, रस्ता रोको,




तसेच अनेक आंदोलने करून शासनाचे लक्ष वेधले आहे. जिल्ह्यातील अनेक लोकप्रतिनिधींना, आमदार खासदारांना भेटून निवेदनही दिलेली आहेत. त्यानुसार लोकप्रतिनिधींनी शिक्षणमंत्री, मुख्यमंत्री, मंत्रालयातील जबाबदार अधिकारी यांना फोन करून पाठपुरावा देखील केलेला आहे. मुख्यमंत्री शिक्षणमंत्री यांनीही वाढीव टप्प्याचा जीआर कॅबिनेट बैठकीत काढतो असे सर्वांना सांगितले आहे. परंतु कॅबिनेट बैठकच लांबत असल्याने हे शिक्षक संतप्त झाले आहेत.

यावेळी जिल्हाध्यक्ष शिवाजी कुरणे, दादा लाड केदारी मगदूम, सुभाष खामकर, शशिकांत खडके, अनिल ल्हायकर, वैद्यनाथ चाटे,जितेंद्र डोंगरे, आत्माराम वाव्हळ, तुकाराम शिंदे, सुरेश कदम, रामदास जामकर, भागवत यादव, पी एस देशमुख, प्रेमकुमार बिंदगे, अरविंद पाटील, राजू भोरे ,भानुदास गाडे, कन्हैय्या पगार, विक्रांत नेरकर, अविनाश वाघ, संग्राम कांबळे, नारायण गायकवाड, रविंद्र कातखडे, कृष्णा शिंदे,मुक्ता मोटे स्मिता उपाध्ये, नेहा भुसारी, गौतमी पाटील, भाग्यश्री राणे, जयश्री पाटील,विद्या पूजेरी यांच्यासह राज्यातील शिक्षक शिक्षिका मोठ्या संख्येने उपस्थित होते.



## लवकरच श्री,लक्ष्मी- नृसिंहच्या ऊस उत्पादक शेतकर्यांच्या खात्यावर दोनशे रूपये प्रमाणे रक्कम जमा होणार-किशोर ढगे

मानवत ।प्रतिनिधी

स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे जिल्हाध्यक्ष किशोर ढगे यांच्या मार्गदर्शनाखाले आज श्री.लक्ष्मी नृसिंह सहकारी साखर कारखान्याचे चऊ श्री. शेजुळ यांची भेट घेऊन कारखान्याच्या कार्यक्षेत्रातील ऊस उत्पादक शेतकर्यांची मागील हंगामातील २००/- रू. आज पर्यंत बाकी राहिली असून ती रक्कम शेतकर्यांच्या खात्यावर तात्काळ जमा करण्यात यावी अन्यथा यंदा चालू हंगामात कारखाना सुरू करू देणार नाही असा ईशारा या वेळी स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या वतीने जिल्हाध्यक्ष किशोर ढगे दिला.

या वेळी ऊस उत्पादक शेतकर्यांच्या वतीने स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या वतीने निवेदन देण्यात आले. या वेळी कारखान्याचे मॅनेजमेंट डायरेक्टर शेजुळ यांनी स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या पदाधिकार्यांशी चर्चा करतांना सांगितले कारखान्याच्या मॅनेजमेंटला बोलुन लवकरात लवकर आपली मागणी मान्य करून ऊस उत्पादक शेतकर्यांच्या खात्यावर रक्कम जमा करायला लाऊ त्यामूळे पून्हा स्वाभिमानी शेतकरी संघटनेला आंदोलन करण्याची वेळ येणार नाही. अशी ग्वाही कारखान्याचे मॅनेजिंग डायरेक्टर शेजूळ यांनी या वेळी स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या शिष्टमंडळास दिली.

## दिलीप गोरे यांचा समर्थकांसह मुंबईत स्वगृही राष्ट्रवादी काँग्रेस-शरद पवार पक्षात जाहीर प्रवेश

**बीड ।प्रतिनिधी**

**राष्ट्रवादी काँग्रेस-शरदचंद्र पवार पक्षाचे सर्वेसर्वा शरदचंद्र पवार साहेब यांच्या भेटीनंतर पक्षप्रवेश करण्याचे निश्चित झाले. सिल्वर ओक येथे शुक्रवार दिनांक २० सप्टेंबर रोजी दुपारी २ वाजता माजी नगराध्यक्ष दिलीप अण्णा गोरे यांच्यासह त्यांच्या सहकाऱ्यांसह समर्थकांनी राष्ट्रवादी काँग्रेस- शरदचंद्र पवार पक्षात जाहीर प्रवेश केला. याप्रसंगी प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी लवकरच बीडमध्ये दिलीप अण्णा गोरे यांच्या नेतृत्वाखाली पक्षाचा मोठा कार्यक्रम आयोजित करून त्यांच्यावर पक्षाची मोठी जबाबदारी सोपवली जाईल असे स्पष्ट केले. या प्रवेशामुळे बीड विधानसभा मतदारसंघासह जिल्ह्यामध्ये राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची ताकद वाढणार आहे. आणि राजकीय समीकरणे सुद्धा बदलणार आहेत.**

दिलेल्या प्रसिद्धीपत्रकात दिलीप अण्णा गोरे यांनी म्हटले आहे की, आज सकाळी आदरणीय शरदचंद्रजी पवार साहेबांना कामानिमित्त भेटीसाठी गेलो असता ११ वाजता प्रवेशाचा निर्णय सिल्वर ओक येथे पक्षाचे संस्थापक अध्यक्ष देशाचे नेते मा.



शरदचंद्रजी पवार साहेब, प्रदेशाध्यक्ष मा. जयंतराव पाटील साहेब, पक्षाच्या राष्ट्रीय कार्याध्यक्ष खासदार सुप्रियाताई सुळे, राज्याचे माजी आरोग्य मंत्री आमदार राजेश भैय्या टोपे, महाराष्ट्राचे माजी गृहमंत्री अनिलजी देशमुख, बीड जिल्ह्याचे पक्ष निरीक्षक जीवनराव गोरे यांच्या उपस्थितीमध्ये निर्णय झाला.त्यानंतर राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी प्रदेश कार्यालयामध्ये दुपारी २ वाजता पक्षप्रवेश सोहळा पार पडला. दिलीप अण्णा गोरे यांच्या समवेत पक्षप्रवेश करत असलेले संजय गव्हाणे,माजी उपसभापती पंचायत समिती, बीड, फेरोज पठाण, माजी पंचायत समिती सदस्य, बीड, अशोकराव पांढरे एसटी कामगार संघटना नेते यांच्यासह समर्थकांचा प्रवेश झाला. दिलीपराव गोरे आणि त्यांचे सर्व सहकारी पवार साहेबांच्या विचाराचे जुनेच सहकारी असल्याने त्यांनी पक्षाबरोबर भविष्यात खंबीरपणे उभे राहण्याचा निर्धार करत पवार साहेबांच्या विचाराला साथ देण्याचा निर्णय घेतला. दिलीपराव गोरे यांनी आपल्या समर्थकांसह बीड जिल्ह्यामध्ये पक्षाची शक्ती आणि ताकद निर्माण करण्यासाठी पक्षासोबत आले त्याबद्दल प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील साहेब यांनी गौरवोद्गार काढले. ते म्हणाले, प्रवेशानंतर दिलीपराव गोरे व प्रवेश केलेल्या त्यांच्या सर्व सहकाऱ्यांच्या विनंतीवरून बीड जिल्ह्यामध्ये लवकरच पक्षाचा मोठा मेळावा घेऊन त्यांच्यावर योग्य ती जबाबदारी सोपवली जाईल असे जाहीर केले.

## भेल संस्कार केंद्रातील विद्यार्थ्यांची गटनिहाय जिल्हास्तरीय खो-खो स्पर्धेसाठी निवड

प्रतिनिधी (परळी वै.)

येथील भा. शि. प्र. संस्था, अंबाजोगाई द्वारा संचलित भेल संस्कार केंद्रातील विद्यार्थ्यांची जिल्हास्तरीय खो-खो स्पर्धेसाठी निवड झालेली आहे. भेल संस्कार केंद्रामध्ये विद्यार्थ्यांच्या ज्ञानाबरोबरच त्यांच्या शारीरिक विकासाकडे काटेकोरपणे लक्ष पुरविले जाते. हे काम केंद्रातील क्रीडा विभाग अगदी कटाक्षाने अविरतपणे करत आहेत. विद्यार्थी जर शारीरिकदृष्ट्या सदृढ राहिला, तरच त्याला ज्ञानार्जन करणे सोपे जाते. यासाठीच विद्यार्थ्यांच्या खेळाकडेही येथे जाणीवपूर्वक लक्ष दिले जाते. *महाराष्ट्र राज्य क्रीडा युवक सेवा संचलनालय पुणे व जिल्हा क्रीडा कार्यालय बीड द्वारा आयोजित* परळी येथे तालुकास्तरीय खो-खो स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत वय वर्षे १४ व १७ या वयोगटातील भेल संस्कार केंद्रातील विद्यार्थ्यांनी प्रथम क्रमांक पटकावून जिल्हास्तरीय खो-खो स्पर्धेसाठी आपली दावेदारी सिद्ध केली.



या सर्व खेळाडूंना खो-खो खेळातील सर्व बारकावे, विविध योजना, डाव, झेप घेऊन खेळाडूस बाद करणे, साखळी पद्धत, पोल वरील खेळाडूस बाद करणे इ. सारख्या असंख्य गोष्टींचे मार्गदर्शन भेल संस्कार केंद्राचे क्रीडाशिक्षक श्री. यशवंत कांबळे सर यांनी विद्यार्थ्यांना वेळोवेळी केले. क्रीडा प्रमुख श्री. लक्ष्मण राडकर सर ,डॉ. श्री. जगदीश कावरे सर व श्री. राजेभाऊ गडदे सर यांचेही वेळोवेळी मार्गदर्शन त्यांना लाभले. विजेत्या खेळाडूंचे कौतुक आणि अभिनंदन सर्वच थरातून होत आहे. यांची झालेली जिल्हास्तरीय निवड अगदी सार्थ आहे अशीच भावना प्रत्येकाच्या मनामध्ये आहे. यानिमित्त संस्कार केंद्राचे श्री. जुगलकिशोर लोहिया (अध्यक्ष,स्थानिक.स.स) श्री. अमोल डुबे (अध्यक्ष, शा. व्य .स) श्री. जीवनराव गडगूळ (कार्यवाह) श्री. राजेश्वर देशमुख सर,सौ. शोभा भंडारी मॅडम(स) मुख्याध्यापक श्री. गिरीश ठाकूर सर, सर्व विभाग प्रमुख, शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी आणि पालक वर्ग यांनीही या खेळाडूंचे अभिनंदन करून त्यांच्या पुढील वाटचालीस हार्दिक शुभेच्छा देऊन प्रोत्साहित केले. अशी माहिती भेल संस्कार केंद्राचे प्रसिद्धी प्रमुख श्री. प्रफुल्ल सर यांनी प्रसिद्धी माध्यमास दिली.

## आदर्श शिक्षण संस्था होमिओपॅथी क्षेत्रात राष्ट्राचे नशीब ठरवणारी संस्था-केंद्रीय आरोग्य राज्य मंत्री प्रतापराव जाधव

बीड/प्रतिनिधी

देशभरात अनेक संस्था शिक्षण क्षेत्रात कार्यरत आहेत या संस्थेतून अनेक विद्यार्थी घडले आहेत,तसेच बीडच्या आदर्श शिक्षण संस्थेचे होमिओपॅथी महाविद्यालय आहे,राष्ट्राचे नशीब याच संस्थेतून घडवले जात असल्याचे गौरवोद्गार देशाचे केंद्रीय आयुष तथा आरोग्य राज्य मंत्री प्रतापराव जाधव यांनी काढले आहे,

आदर्श शिक्षण संस्थेच्या सोनाजीराव क्षीरसागर होमिओपॅथी महाविद्यालयास १५ सप्टेंबर २०२४ रोजी ५० वर्ष पूर्ण झाल्याबद्दल सुवर्ण महोत्सव कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून केंद्रीय आयुष तथा आरोग्य राज्य मंत्री प्रतापराव जाधव यांनी दुरदृश्य प्रणाली द्वारे आपले मनोगत व्यक्त केले,याप्रसंगी संस्थेचे सचिव तथा माजीमंत्री जयदत्त क्षीरसागर अध्यक्षस्थानी होते तर प्रमुख पाहुणे म्हणून राष्ट्रीय होमिओपॅथी आयोगाचे रजिस्ट्रेशन बोर्डाचे अध्यक्ष डॉ पिनाकिन त्रिवेदी,सचिव डॉ संजय गुप्ता,सदस्य डॉ शेंथील कुमार,महाराष्ट्र आयुष्यमान भारत योजनेचे प्रमुख डॉ ओमप्रकाश शेटे व आरोग्य विज्ञान विद्यापीठाच्या होमिओपॅथी विद्या शाखेचे अधिष्ठाता डॉ राजकुमार पाटील उपस्थित होते,यावेळी बोलताना केंद्रीय आरोग्य राज्य मंत्री जाधव म्हणाले की, आदर्श शिक्षण संस्थेचे सोनाजीराव क्षीरसागर होमिओपॅथिक वैद्यकीय महाविद्यालय,बीड हे १५ सप्टेंबर २०२४ रोजी सुवर्णमहोत्सवी वर्ष साजरे करत आहे आणि या प्रसंगी स्मरणार्थ राष्ट्रीय होमिओपॅथिक सेमिनार आणि माजी विद्यार्थ्यांचा माजी विद्यार्थी मेळावा आयोजित करत आहे हे जाणून मला आनंद झाला.




मला खात्री आहे की हे पुनर्मिलन तुम्हाला भूतकाळातील सुखद स्मृती दूर करेल आणि तुम्ही तुमच्या शिक्षक,मार्गदर्शक आणि मित्रांसोबत घालवलेले गोड क्षण जपण्यास मदत करेल.ही संस्था १९७४ मध्ये कै.श्रीमती केशरकाकू यांनी सुरू केली होती. केशरबाई क्षीरसागर,माजी खासदार आणि आता त्यांचे सुपुत्र जयदत्त क्षीरसागर महाराष्ट्राचे माजी मंत्री,ज्यांचे दर्जेदार शिक्षण आणि समाजाच्या विकासासाठी उत्कृष्ट योगदान आहे,हे महाविद्यालय १९९४ मध्ये होमिओपॅथीचा पहिला एम.डी.अभ्यासक्रम सुरू करणारी महाराष्ट्रातील अग्रगण्य संस्थांपैकी एक आहे आणि तोच टप्पा गाठणारी भारतातील दुसरी संस्था आहे.पीएच.डी.सुरू करणारी ही पहिली संस्था होण्याचे श्रेयही या महाविद्यालयाला जाते.देशात होमिओपॅथी क्षेत्रात राष्ट्राचे नशीब ठरवणारी ही संस्था आहे असे म्हणतात.आयुष मंत्रालयाअंतर्गत कोलकाता येथील प्रतिष्ठित नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ होमिओपॅथी (छखक) चे तीन संचालक तयार करून या संस्थेने ही म्हण अक्षरशः सिद्ध केली आहे. एनआयएचचे माजी संचालक,डॉ.ईश्वर दास आणि डॉ.एस.के.तिवारी यांनी या महाविद्यालयातून पदव्युत्तर शिक्षण पूर्ण केले होते,तर एनआयएचचे विद्यमान संचालक डॉ. सुभाष सिंग यांनीही या महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी,एम.डी.आणि पीएच.डी.या पासून महाविद्यालय आणखी अनेक माजी विद्यार्थ्यांनी स्वत:ला यशस्वी व्यावसायिक म्हणून स्थापित केले आहे आणि होमिओपॅथीद्वारे सर्वोत्तम आरोग्य सेवांमध्ये योगदान देणे,सर्व अडचणींना तोंड देत प्रगती करणारी अशी संस्था आपल्या महाराष्ट्रात अस्तित्वात आहे याचा मला अभिमान वाटतो.त्यांनी होमिओपॅथीमध्ये विशेषत: उच्च शिक्षणात प्रचंड काम केले आहे.मी तुम्हा सर्वांचे अभिनंदन करतो आणि महाविद्यालय व्यवस्थापन, प्राध्यापक,कर्मचारी सदस्य आणि सर्व भूतकाळातील आणि वर्तमान विद्यार्थ्यांना त्यांच्या भविष्यातील प्रयत्नांसाठी माझ्या मन:पूर्वक शुभेच्छा देतो.यशस्वी कार्यक्रमासाठी मी सर्व सहभागी, माजी विद्यार्थी आणि विद्यार्थ्यांना माझ्या शुभेच्छा देतो असे केंद्रीय आरोग्य व आयुष राज्य मंत्री प्रतापराव जाधव यांनी भरगच्च कार्यक्रमात दुरदृश्य प्रणाली द्वारे म्हणताच उपस्थितांनी त्यांचे जोरदार स्वागत केले



## ज्ञानदीप प्राथमिक विद्यालयाचा संघ जिल्हास्तरीय खो-खो स्पर्धेसाठी पात्र

किल्लेधारुर / प्रतिनिधि

येथील तालुकास्तरीय खो खो स्पर्धेत ज्ञानदीप प्राथमिक विद्यालयाच्या संघाने अंतिम सामन्यात दणदणीत विजय मिळवत जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी पात्र ठरला. क्रीडा व युवक सेवा संचनालय पुणे यांच्या वतीने शासकीय शालेय तालुका स्तरावरील खो खो व कबड्डी क्रीडा स्पर्धा २०२४-२५ चे आयोजन धारूर तालुक्यातील आदर्श गाव आवरगाव या ठिकाणी करण्यात आले होते. या खो खो स्पर्धेत १४ वर्ष वयोगटातील मुला मुलींचे एकून ४३ संघ सहभागी झाले होते. दि.२० सप्टेंबर शुक्रवार रोजी या खो खो स्पर्धेतील उपांत्य व अंतिम सामने ज्ञानदीप शाळेच्या मैदानावर घेण्यात आले. या सामन्याचा शुभारंभ ज्येष्ठ पत्रकार सय्यद शाकेर व दिनेश कापसे यांच्या उपस्थितीत करण्यात आला. स्पर्धेच्या अंतिम सामन्यात जिजामाता विद्यालय तेलगाव व ज्ञानदीप विद्यालय धारुर यांच्यात चुरशीचा सामना झाला. यात ज्ञानदीप विद्यालयाच्या खेळाडूनी विजय मिळवत जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी प्रवेश मिळवला. यावेळी तालुक्यातील क्रीडा समन्वयक लहुकुमार गव्हाणे यांच्यासह विविध शाळेतील क्रीडा शिक्षक, ज्ञानदीप विद्यालयाचे मुख्याध्यापक शेख शाहेद, क्रीडा शिक्षक मुंजाराम निरडे, शिक्षक विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.उपस्थितांनी खेळाडूंचे अभिनंदन करत शुभेच्छा दिल्या.

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक इंदर थोरात यांनी निर्मिती प्रिंटस्, धोंडीपुरा, टिळक रोड, जोशी नर्सिंग होमसमोर, बीड ता.जि.बीड-४३११२२ येथे छापुन कार्यालय सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ, घर नं.१-७-३८१,जुन्या पोलीस अधीक्षक कार्यालयाजवळ, थोरातवाडी बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक - दीपक इंदर थोरात

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER DEEPAK INDAR THORAT AT THE NIRMITI PRINTS,TILAK ROAD , DHONDIPURA, IN FRONT OF JOSHI NURSING HOME, BEED, TQ.BEED DIST.BEED-431122 (MH) AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAILY EVENING MAHARASHTRA AARAMBH , H.NO.1-7-381, NEAR OLD S.P. OFFICE,THORATWADI, BEED TQ.DIST.BEED -431122 EDITOR - DIPAK INDAR THORAT